जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नंदुरबार यांच्या दि.४.६.२०१५ रोजीच्या निकालानुसार कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये दरम्यान मृत्यु पावलेल्या श्रीमती शर्मिला मानसिंग गावीत यांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः कुनिश-२०१७/१५५०/प्र.क्र.६९७/कु.क.

बी विंग, १० वा मजला, गो.ते. रुग्णालय, संकूल इमारत
लो.टि. मार्ग, मुंबई ४०० ००१.
तारीख: ०६ जानेवारी, २०१८

वाचा :-

१) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नंदुरबार यांचे ग्राहक तक्रार क्रमांक ३९/२०११ च्या संदर्भात, दि.४.६.२०१५ चे आदेश.

२) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे क्र.राकुकका/दक्षता/कक्ष -८(ब) /श्रीमती शर्मिला गावीत /कुनिश मृत्यु/न्या.प्रकरण/न.क्र.१३९/७१६४६-५०/२०१७, दि.१३.११.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये दरम्यान श्रीमती शर्मिला मानसिंग गावीत यांचा मृत्यु झाल्यासंदर्भात त्यांचे पती श्री.मानसिंग अेमथ्या गावीत यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नंदुरबार यांच्याकडे तक्रार क्रमांक ३९/२०११ दाखल केली होती. सदर प्रकरणी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नंदुरबार यांनी दि.४.६.२०१५ रोजीच्या सुनावणीच्या वेळी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये दरम्यान मृत्यु पावलेल्या श्रीमती शर्मिला मानसिंग गावीत यांचे पती श्री. मानसिंग अेमथ्या गावीत यांना रुपये २ लक्ष निकालाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत देण्याचे आदेश दिले होते. सदर प्रकरणी रु.२०,०००/- तक्रारदारास दिले असल्याने व उर्वरित रक्कम रु.१,८०,०००/- देण्यास विलंब झालेला असल्याने रुपये २४,०००/- व्याजासह एकूण रु.२,०४,०००/- एवढी रक्कम तक्रारदारास देण्याचे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,

नंदुरबार यांचे दि.२५.१०.२०१७ चे आदेश आहेत. त्यास अनुसरुन संदर्भ क्र.२ अन्वये अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे यांनी शासनास प्रस्ताव सादर केला आहे. याबाबत शासन पुढीलप्रमाणे मंजूरी देत आहे.

शासन निर्णय:-

तक्रार क्रमांक ३९/२०११ संदर्भात जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नंदुरबार यांच्या दि.४.६.२०१५ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेदरम्यान मृत पावलेल्या श्रीमती शर्मिला मानसिंग गावीत यांचे पती श्री.मानसिंग अेमथ्या गावीत यांना रु.२,०४,०००/- (रुपये दोन लक्ष चार हजार फक्त)एवढी रक्कम देण्यासाठी या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे हे आहंरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील.

२. यासाठी होणारा खर्च मागणी -आर १ २२११ कुटुंब कल्याण, १०५ नुकसान भरपाई (०१) नुकसान भरपाई पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०२) पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेसाठी प्रोत्साहनात्मक रक्कम (२२११ ०५९७) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या मंजूर तरतूदीनुसार भागविण्यात यावा.

३. सदरचा आर्थिक लाभ थेट लाभार्थिच्या आधार लिंक बँक खात्यात जमा करण्यात येईल याची दक्षता आंहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी व सदर प्रकरणी तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास सादर करुन त्याची एक प्रत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नंदुरबार यांना सादर करावी.

हा शासन निर्णय वित्तीय नियम अधिकार पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उप विभाग-२, अ.क्र.२, नियम क्र.७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०६१११७२६९०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujwala Arun Ransing

Digitally signed by Ujwala Arun Ransing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7788b3b31e2d9269bcbfd9588a6ee4771341780133d295a56dd4ef476977773, serialNumber=3b8f98f1c182bf458a4deee399a7241b5044aeb09c097bc6d28b58709fe8ef0d, cn=Ujwala Arun Ransing
Date: 2018.01.06 16:23:26 +05'30'

(उज्वला अ रणसिंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त , आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य सेवा, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३) अतिरिक्त संचालक, आरोगय सेवा, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नंदुरबार, नवीन न्यायालय इमारतीच्या पाठिमागे, जिल्हा परिषद कर्मचारी वसाहती जवळ, टोकर तलाव रोड, नंदुरबार.
५) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार
६) श्री.मानसिंग अेमथ्या गावीत, रा.भांगडा, ता.जि.नंदुरबार
७) अवर सचिव (अर्थसंकल्प) सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई
८) निवडनस्ती (कुक)